




# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२५९ ■ सोमवार २२ जुन २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26







## भारतीय महापुरूषांनी योग नव्या उंचीवर नेल्याने योग दिन सर्वात मोठा उत्सव - प्रधानमंत्री मोदी

**कोलकत्ता, दि. २१ - पृथ्वीच्या काही भागांमध्ये एकवीस जून हा वर्षातील सर्वात मोठा दिवस असतो. आंतरराष्ट्रीय योग दिनामुळे हा दिवस जगातील सर्वात मोठ्या सामूहिक उत्सवाचा दिवस बनला आहे. या देशातील स्वामी रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, महर्षी अरविंद यांचा उल्लेख केला आणि सांगितले की, त्यांनी योग परंपरेला नव्या उंचीवर नेऊन ठेवले. योगाभ्यास केवळ विशिष्ट प्रसंगांपुरता मर्यादित ठेवू नये. तो आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवला पाहिजे. योगाभ्यास केवळ एका दिवसापुरता किंवा एका कार्यक्रमापुरता मर्यादित न ठेवण्याचा संकल्प आपण करू या. आपण योगाला आपले जीवन, आपले कुटुंब आणि भावी पिढ्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवू या, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त केले. कोलकात्याच्या रेड रोडवर पस्तीस हजार लोकांच्या समुदायासोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगाभ्यास केला आणि योगाचे महत्व पटवून दिले.**

कोलकाता येथे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होताना पंतप्रधान म्हणाले, आंतरराष्ट्रीय योग दिन जगातील सर्वात मोठ्या सामूहिक उत्सवाचा दिवस झाला आहे. परस्परांशी जोडले जाण्याची भावना हाच योगाचा मूळ गाभा असल्याचे नमूद करत पंतप्रधानांनी सांगितले की, संपूर्ण देश आणि जग एकमेकांशी जोडलेले असल्याचे दिसून येते



आणि हीच योगाची खरी ताकद आहे. आपले ध्येय असे असले पाहिजे की, वयाच्या विशीच्या तुलनेत चाळीशीत आपण अधिक लवचिक असावे. तिशीच्या तुलनेत पन्नाशीत अधिक उत्साही असावे. यामुळे शरीर लवचिक राहण्यास आणि ऊर्जेची पातळी उच्च राखण्यास मदत होते. पंतप्रधान मोदी यांनी लोकांना असे आवाहनही केले की, त्यांनी योगाभ्यास केवळ विशिष्ट प्रसंगांपुरता मर्यादित ठेवू नये, तर तो आपल्या दैनंदिन जीवनाचा एक भाग बनवला पाहिजे. योग केवळ एका (पान ४ वर)

## विधान परिषदेसाठी आज अकरा जागांची मतमोजणी

मुंबई, दि. २१ : राज्य विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील सतरा पैकी सहा जागांवर महायुतीने मतदानापूर्वीच बिनविरोध विजय मिळवला आहे. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष उर्वरित अकरा जागांच्या निकालाकडे लागले आहे. या बहुचर्चित निवडणुकीची मतमोजणी उद्या (दि.२२) होणार आहे.

या निवडणुकीत अनेक नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. अमरावती मतदारसंघात काँग्रेसमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला. पक्षाने आपल्या सदस्यांना मतदानात तटस्थ राहण्याचा व्हिप (पक्षादेश) बजावला होता. मात्र काँग्रेस नगरसेवकांनी तो धुडकावून लावत मतदानात भाग घेतला. दुसरीकडे, नाशिक आणि भंडारा-गोंदिया या मतदारसंघांमध्ये मतदारांनी शंभर टक्के मतदानाचा हक्क बजावला.

छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघात (पान ४ वर)

## कर्जमाफी फसवीच, शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा सरकारच्या चहापान कार्यक्रमावर बहिष्कार - मविआ

**मुंबई, दि. २१ : राज्य सरकारच्या अपयशी कारभाराविरोधात आणि जनतेच्या प्रश्नांबाबत सरकारच्या असंवेदनशील भूमिकेचा आम्ही निषेध करीत आहोत. त्यासाठीच महाविकास आघाडीने विधानमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या सरकारच्या चहापान कार्यक्रमावर बहिष्कार टाकल्याची घोषणा पत्रकार परिषदेत करण्यात आली. यावेळी महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे नेते उपस्थित होते. भाजपच्या नेतृत्वाखाली हे सरकार छपन्न टक्के कमिशन सरकार आहे. राज्यावरील कर्जाचा बोजा साडेनऊ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याने महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चिंताजनक बनली आहे, अशी**



**टीका सतेज पाटील यांनी पत्रकार परिषदेत केली.**

महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी राज्यातील गंभीर प्रश्नांकडे सरकारचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. राज्यात दुष्काळ,शेतकरी प्रश्न, महिलांवरील वाढते अत्याचार, ढासळलेली कायदा-सुव्यवस्था, वाढते अंमलीपदार्थांचे जाळे यासारख्या अनेक प्रश्नांवर सरकारकडे कोणतेही समाधानकारक उत्तर नसल्याची टीका महाविकास आघाडीने केली. राज्यावर दुष्काळाचे संकट आहे. पेरण्या लांबल्या आहेत, शेतकऱ्यांसमोरील अडचणी वाढत आहेत. सरकारने कोरडा दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शिवसेनेचे गटनेते भास्कर जाधव यांनी पत्रकार परिषदेत केली. सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही फसवी असून त्यात शेतकऱ्यांना अटी शर्तीमध्ये अडकवण्यात आले आहे. महायुती सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, अशी मागणी महाविकास आघाडीने यावेळी केली. (पान ४ वर)

## मुडावद ते बेटावद रस्त्याची अपुर्ण कामे पुर्ण करा अधिकाऱ्यांना रस्त्यावरच रोखत निवेदन केले सादर

**सोनगीर, दि. २१ (प्रतिनिधी) - मुडावद ते बेटावद या मार्गावरील रखडलेल्या आणि निकृष्ट दर्जाच्या रस्त्याच्या कामामुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांविरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे. गावात पाहणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना थेट खराब रस्त्यावरच नेऊन ग्रामस्थांनी त्यांना वास्तवाची जाणीव करून दिली व रस्त्यावरच निवेदन सादर केले. ग्रामस्थांचा आक्रमक पवित्रा पाहून अधिकाऱ्यांनी थेट**



**घटनास्थळावरूनच ठेकेदाराला फोन लावून उर्वरित काम तत्काळ सुरू करण्याचे आदेश दिले.**

सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे येथील कार्यकारी अभियंता आर. आर. पाटील आणि शिंदखेडा उत्तर विभागाचे उपअभियंता हे १९ जून रोजी मुडावद येथील कपिलेश्वर मंदिराच्या अपूर्ण पादचारी पुलाची पाहणी (पान ४ वर)

## इंधन चोरी पाठोपाठ गुंगीच्या औषधांची अवैध वाहतूक

धुळे, दि.२१ - कुसुंबा (ता धुळे) येथील उड्डाणपुलाखाली रेक्सॉन व -कॅनॅक्सटी कंपनीच्या गुंगीच्या औषधाची अवैध वाहतूक करणारी कार पोलिसांनी पकडली. साक्री येथील इंधन चोरी पाठोपाठ आता औषधाची अवैध विक्रीचा प्रकार उघडकीस आला. दहा लाख ५० हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. तीन जणांविरुद्ध तालुका पोलिसात गुन्हा दाखल झाला. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, एलसीबीचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी कारवाई केली. कुसुंबा (ता धुळे) येथील (पान ४ वर)

## धुळे जिल्हा काँग्रेसचे बूथस्तरीय संघटनात्मक बांधणी मजबूत; प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

**धुळे, दि.२१ - आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धुळे शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस भवन येथे प्रभागनिहाय बूथस्तरीय मतदार यादी प्रतिनिधींची नियुक्ती जाहीर करण्यात आली. यासोबतच प्रतिनिधींसाठी आयोजित प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी नियुक्त मार्गदर्शक तथा प्रशिक्षक अॅड. सागर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.**



कार्यक्रमास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष तथा बी.एल.ए.- मा. भा. ई. नगराळे, धुळे शहर काँग्रेस अध्यक्ष साबीर खान शेठ, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष युवराजआबा करनकाळ, ज्येष्ठ काँग्रेस नेते तथा माजी मंत्री रमेश अण्णा श्रीखंडे, शहर काँग्रेसचे कार्याध्यक्ष अॅड. सुधीर जाधव, सेवा दलाचे ज्येष्ठ नेते रवींद्र चौधरी, जिल्हा सेवा दल अध्यक्ष आलोक रघुवंशी, शहराध्यक्ष राजेंद्र खैरनार, असंघटित कामगार नेते दीपक पाटील, किशोर वाकळे, (पान ४ वर)

## जिल्हा पोलीस प्रशासनातील अठरा अधिकाऱ्यांच्या बदल्या

धुळे, दि.२१ - धुळे जिल्हा पोलिस प्रशासनातील अठरा पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या. पाच पोलिस निरीक्षक, सात सहाय्यकांसह अन्य अधिकाऱ्यांचा त्यात समावेश आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी या संदर्भातले आदेश काढले.


जिल्हा पोलिस प्रशासनाच्या निर्णयानुसार विविध पोलिस ठाणे, नियंत्रण कक्षामधील अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. त्यात आझाद नगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक निवृत्ती गंगाराम पवार नियंत्रण कक्ष, जिल्हा विशेष शाखेचे विनोद उत्तमराव पाटील आझाद नगर पोलीस ठाणे, चाळीसगाव रोड (पान ४ वर)



## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भाजप कार्यालयात योगसाधनेचा संकल्प

**धुळे, दि.२१- आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात भाजपा जिल्हाध्यक्ष मा. श्री. गजेंद्र अंपळकर यांच्या नेतृत्वाखाली उत्साहपूर्ण वातावरणात योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी योगाचे महत्त्व अधोरेखित करत नियमित योगसाधनेचा संकल्प करण्यात आला.**

कार्यक्रमादरम्यान आजपासून संपूर्ण वर्षभर भाजपा कार्यालयात दररोज नियमित योगसाधना आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. योग ही केवळ व्यायाम पद्धती नसून निरोगी, संतुलित आणि सकारात्मक जीवनशैलीचा पाया असल्याचे यावेळी वक्त्यांनी सांगितले.



## हस्ती ग्रुप ऑफ स्कूल येथे जागतिक योग दिन विद्यार्थ्यांनी उत्साहात साजरा केला

**दोंडाईचा, दि.२१ वि.प्र.- आरोग्यदायी जीवनासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या योग दिनाच्या उत्सव आज हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पब्लिक स्कूल व ज्यू. कॉलेज, हस्ती वर्ल्ड स्कूल आणि हस्ती गुरुकुल दाऊळ शिवार दोंडाईचा येथे हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या मध्यवर्ती प्रांगणात शेकडो विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी एकत्र येत योग साधनेत सहभाग घेतला.**

या कार्यक्रमाच्या प्रारंभी माता सरस्वती देवी, स्व. दादाजी हस्तीमलजी जैन, स्व. पप्पाजी शांतीलालजी जैन, स्व. काकाजी कांतीलालजी जैन यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यार्थी व प्रमुख अतिथी व डॉ. राजेंद्र भावसार योग प्रशिक्षक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी हस्ती स्कूलच्या प्राचार्या रझिया दाऊदी, हस्ती वर्ल्ड स्कूलचे प्राचार्य जिवन सपकाळे, हस्ती गुरुकुलचे मुख्याध्यापक सदाशिव महाजन, समन्वयक मनोज ठाकूर, (पान ४ वर)

## सेंद्रिय कर्ब वाढवण्यासाठी हिरवळीच्या खतांच्या बियाण्यासाठी अनुदानाची मागणी

धुळे दि,२१ - जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढविणेसाठी हिरवळीच्या पिकांच्या बियाणेस अनुदानाची मागणी कृषिभूषण अॅड.प्रकाश पाटील पढावद यांनी मा सुरज मांढरे आयुक्त सो कृषी पुणे यांचे कडे केली. राज्यातील शेतजमिनीचा सेंद्रिय कर्ब अत्यंत कमी झालेला आहे.ज्या जमिनीचा सेंद्रिय कर्ब कमी असतो, तेथे जिवाणु कमी असतात. जमिनीला दिलेली सेंद्रिय खते, रासायनिक खते ही पिके घेऊ शकत नाहीत. ही खते पिकांना उपलब्ध



करणेसाठी जमिनीत जिवाणु असणे महत्त्वाचे आहे. जिवाणु नसतील तर आपण दिलेली रासायनिक खते पिकांना उपलब्ध होत नाहीत. खतांचा आपला खर्च वाढतो. व जी जमिनीतील खते उपलब्ध होत नाहीत, ती जमिनीत पडुन असतात.यामुळे आपल्या जमिनीवर विपरीत परिणाम होऊन,जमिन कडक होते, पाण्याचा निचरा (पान ४ वर)

## नागरिकांचा माहितीचा अधिकारच काढून टाकण्याचे प्रयत्न; बेकायदेशीर तरतुदी रद्द करा- सपकाळ

**मुंबई, दि.२०- सरकारी कारभारात पारदर्शकता असावी आणि त्याचे उत्तरदायित्व निश्चित करण्यासाठी काँग्रेसप्रणित युपीए सरकारने जनतेला ऐतिहासिक असा माहिती अधिकार कायद्याचा अत्यंत महत्त्वाचा अधिकार दिला आहे, पण सध्याच्या सरकारने मात्र नागरिकांना माहितीपासून दूर ठेवण्यासाठी अडथळ्यांची भिंत उभी केली आहे. राज्याच्या**



**सामान्य प्रशासन विभागाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या राजपत्रात गंभीर कायदेशीर त्रुटी व मूळ कायद्याशी विसंगत तरतुदी करण्यात आल्या आहेत. यामुळे नागरिकांचा माहितीचा अधिकारच काढून टाकण्याचा प्रयत्न केलेला असून यामुळे शासनाच्या पारदर्शकतेच्या तत्त्वालाही धक्का पोहोचत आहे. सरकारने तातडीने या बेकायदेशीर तरतुदी रद्द कराव्यात, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.**

राज्याचे मुख्य सचिव यांना यासंदर्भात पाठवलेल्या पत्रात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणतात की, सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १२ जून २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये बेकायदेशीर तरतुदी रद्द केल्या आहेत. माहिती अधिकार अर्ज, प्रथम अपील, द्वितीय अपील तसेच माहिती उपलब्ध(पान ४ वर)



## मुकेश आर.पटेल सीबीएसई स्कूलच्या विद्यार्थ्याची राष्ट्रीय स्तरावर कामगिरी

शिरपूर, दि.२०- श्री विलेपार्ले केळवणी मंडळ, मुंबई संचलित तांडे ता. शिरपूर येथील मुकेश आर. पटेल निवासी सीबीएसई स्कूलच्या इयत्ता आठवीतील विद्यार्थी अजिंक्य दिपक चौधरी याने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उल्लेखनीय यश (पान ४ वर)

## ग्लोबल ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट सेंटरचे सर्व्हेक्षण पटेल स्वायत्त अभियांत्रिकीला राज्यपातळीवर चौथे स्थान

**शिरपूर, दि.२०- व्यवस्थापन, अभियांत्रिकी आणि हॉटेल मॅनेजमेंट क्षेत्रातील नामांकित संस्था ग्लोबल ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट सेंटर द्वारे २०२६ चे राष्ट्रीय सर्वेक्षण जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये शिरपूर येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. विविध निकषांवर खरे उतरत या महाविद्यालयाने राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट तंत्रज्ञान शिक्षण श्रेणीत देशभरात ३७ वे, तर महाराष्ट्रातील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये चौथे स्थान पटकावले आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.**

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यवस्थापन तज्ज्ञांच्या संकल्पनेतून १९९७ मध्ये स्थापन झालेल्या ग्लोबल ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट सेंटर या नामांकित संस्थेच्या वतीने दरवर्षी व्यवसाय व्यवस्थापन, अभियांत्रिकी आणि हॉटेल मॅनेजमेंट क्षेत्रात शिक्षण व संशोधनाचे कार्य करणाऱ्या संस्थांचे राष्ट्रीय सर्वेक्षण हाती घेऊन त्यांची रँकिंग जाहीर करत १६ वर्षांपासून आपले मौल्यवान योगदान देत आहे. जीएचआरडीसी च्या सर्वेक्षणातील माहिती आणि मानांकन संपूर्ण देशात शैक्षणिक संस्था, इच्छुक विद्यार्थी आणि भर्ती करणारे उद्योजक या सर्व महत्त्वाच्या भागधारकांमध्ये अत्यंत विश्वासार्ह मानली जातात. या सर्व्हेक्षणात अनेक बाबी समाविष्ट करण्यात आल्या होत्या. या देशपातळीवरील सर्वेक्षणात महाविद्यालयाच्या सर्वांगीण कामगिरीचे कडक निकषांवर मूल्यमापन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने अत्याधुनिक इन्फ्रास्ट्रक्चर, इतर शैक्षणिक सुविधा, उच्चशिक्षित प्राध्यापक वर्ग, प्रगत अध्ययन-अध्यापन पद्धती, पारदर्शक प्रवेश प्रक्रिया आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक आर्थिक संरचना या बाबी तपासल्या गेल्या. यासोबतच उत्कृष्ट प्लेसमेंट, उद्योजकतेला दिलेले प्रोत्साहन, उद्योग क्षेत्राशी असलेला थेट संवाद, सक्रिय माजी विद्यार्थ्यांचे नेटवर्क, महाविद्यालयाचे युनिक सेलिंग पॉइंट्स, संशोधन वृत्ती आणि सामाजिक (पान ४ वर)


**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,33,300 रु.+3% GST

सोने- 24 K -1,45,500 रु.+3% GST

चांदी- 2,35,000 रु.+3% GST

तारगल्ली, सराफ बाजार, धुळे


फोन नं.२३३१०३/२३४१०३


## मोहाडीतील घरफोडीत वीस हजार लंपास

धुळे, दि.२१- मोहाडी दंडेवाला बाबा नगरमधील घरातून चोरट्याने २० हजारांची रोकडसह, कुलरचा टप चोरुन नेला.

शोभा बळीराम वाघ (वय ३४) यांचे तिखी रोडलगत दंडेवाला बाबा नगरमध्ये घर आहे. कुटुंबीयांसह ते बाहेर गावी गेल्याने घर बंद होते. चोरट्याने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील कपाटातून २० हजारांची रोकडसह कुलरचा टप चोरुन नेला. कुटुंबीय शुक्रवारी (ता.१९) घरी आल्यानंतर घरफोडी झाल्याचे निदर्शनास आले. संशयित हेमंत पांचाळ (रा. मोहाडी) याला पोलिसांनी अटक केली आहे.


**३५ वा स्मृतिदिन**



कै. पी. भास्करन उर्फ वासु अण्णा

(स्वर्गवास - २२.६.१९९१)

अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमें
अपार कष्ट सहकर, आपने हमे
जीवन में सक्षम बनाया।
आप हमेशा हमारे हृदयमे विराजमान
रहेंगे और आपका आशिर्वाद भी
हमेशा हमारे साथ रहेगा।।
आपके पवित्र श्रीचरणोंमे विनम्र अभिवादन।

✻ श्रध्दावनत ✻

**वासवा फॅमिली**

**एवं समस्त कर्मचारी धुलीया.**

आपला महाराष्ट्र

# निढळावरती हात ठेऊनी वाट किती पाहू..!


माणूस हा प्राणी खूप तडजोडवादी आहे. असंख्य लोकांची जीवन शैली चंगळवादी किंवा सुविधा जनक असते. पण जेव्हा त्यात खंड पडतो किंवा साधन सुविधा दुर्मिळ होतात तेव्हा तो परिस्थितीशी जुळवून घेत असतो. कोरोना काळात प्रत्येक घरात तसा अनुभव आला. एरवी घरातही सुटा बुटात राहणारे बंगल्यातील सज्जन कोरोना काळात अक्षरशः चड्डीवर दोन वर्ष राहिले. जाणार कुठे? कुणाला आपले वैभव दाखवणार? तशी अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली होती. त्या काळात गरजेपेक्षा अधिक काहीच नको अशा भूमिके पर्यंत लोक आले होते. जीवनाचा काय भरोसा? असे प्रश्न ते स्वत:लाच विचारत होते. त्या प्रश्नांची उत्तरे घरातल्या घरात शोधत होते. कोरोना नंतर पुन्हा माणूस मूळ पदावर आला आणि पुन्हा साधनसामग्री आणि पैसा जुळवण्याच्या कामात मग्न होऊन गेला. तो सहनशील देखील प्रचंड आहे असेही त्या काळात दिसून आले. हा अनुभव तर मानवी जीवनात पदोपदी येतो. एक काळ असा होता की धुळे शहरात १५ ते २० दिवस प्यायला पाणी मिळत नसे, सायकलच्या हँडलवर पुढे दोन बादल्या, कॅरिअरवर हंडा जिथे पाणी मिळेल तिथून भरून घरी आणण्याचे उद्योग घरातील मुले आणि महिला करीत असत. पण त्यासाठी एकानेही रस्त्यावर येऊन पाण्याच्या व्यवस्थेची मागणी केली नाही. इतके आपले लोक सहनशील आहेत. आपल्या सहनशीलतेचा दाखला देताना ते सतत युक्तिवाद करीत असतात. तत्त्वज्ञान सांगत असतात. निसर्गाच्या पुढे आपले काही चालत नाही आपण हतबल आहोत असेही बोलत असतात. सध्या नैऋत्य मान्सून रुसून बसल्यामुळे त्याबाबतची चर्चा जोरात चालू आहे. वेळेवर तो केरळमध्ये आला. वेळेवरच गोव्यात आला, वेळेवरच कोकणात पोहोचला. परंतु गेल्या दोन आठवड्यांपासून तो मुंबईकडे आणि मुंबईकडून उर्वरित महाराष्ट्राकडे येण्यास तयार नाही. हरणे बंदर आणि सोलापूर मध्य महाराष्ट्रातच तो रेंगाळलेला आहे. मध्यंतरी अशाही बातम्या येत होत्या की, कोकणातूनही मानसून ने माघार घेतलेली आहे. अशा बातम्यांमुळे गावोगावच्या लोकांच्या पायाखालची वाळू सरकली. त्यातल्या त्यात एल निनोमुळे मोठी चर्चा सुरू झाली.

सर्वसामान्य माणसाला निनोची व्याख्या कळत नाही. हवामानात किंवा निसर्गात कशाचा तरी बदल झालेला आहे आणि त्यामुळे पाऊस येत नाही. समुद्र उकळत आहे. ढग तयार होत नाहीत. मग पाऊस कसा येणार अशा चर्चा रंगलेल्या आहेत. उन्हाळ्यात शेतीची मशागत होऊन पूर्ण झाली. लग्न व्यवहार संपले. नातेवाईकांकडे फेऱ्या झाल्या. आमरस पोळीचे यथेच्छ भोजन झाले. भाचे कंपनी मामाच्या गावाला जाऊन आली. सुट्ट्या संपल्या. शाळेत जाण्याची लगबग सुरू झाली. हळूच सात जून रोजी मृग नक्षत्र सुरू झाले. पण एक दोन ठिकाण वगळता महाराष्ट्रात कुठेही पाऊस काही आला नाही. शेतकऱ्यांनी शेतीची पूर्ण तयारी केली. बी बियाणे खते विकत घेतली. पेरणीची जय्यत तयारी झाली. पण पावसाचा पत्ता नाही म्हणून काळजी वाढली. चिंतेचे ढग वाहू लागले. मनात त्यामुळे भीती निर्माण झाली. परंतु त्यातही मनाची समजूत घालून उपाय शोधण्याचा माणसाचा प्रयतक अधोरेखित झाला. बऱ्याच लोकांनी समाज माध्यमांवर अशा पोस्ट टाकल्या की, अधिक महिना आल्यामुळे एक महिना पाऊस देखील उशिरा येणार आहे. हा महिना असल्यामुळे तो एक महिना आधी कसा येईल असे सवाल करीत निसर्गाचे चक्र त्याच्या पद्धतीने बरोबर आहे अशी मनाची समजूत घालून दैनंदिन व्यवहाराशी जुळवून घेणारा मोठा वर्ग दिसला. कधीही यापूर्वी अधिक महिन्यात पाऊस पडला नाही असे इतिहासाचे अंदाज देखील अनेकांनी मांडले. काहींनी विशिष्ट पंचांगाचे दाखले दिले. या पंचांगानुसार पाऊस आपल्या वेळेवरच कोसळणार आहे. निसर्गाचे चक्र त्याच्या ठिकाणी बरोबरच आहे अशी मांडणी त्या पंचांगांचा आधार घेऊन अनेकांनी केली. ही एक प्रकारची मनाची समजूतच आहे. तर त्याचवेळी दुसऱ्या बाजूला वैज्ञानिकांनी सांगितल्याप्रमाणे एल निनोचा धोका मोठ्या प्रमाणावर असल्याचे सरकारने देखील सांगितले आहे. निरनिराळे वैज्ञानिक याबाबत बोलत आहेत. म्हणून अधिक काळजीचा मुद्दा उपस्थित झालेला आहे.

अशा संकटाच्या काळात कुठलातरी समजूतदारीचा उपाय शोधून काढून लोकांना दिलासा देण्याचे काम काही लोक करीत असतात. काही खाजगी हवामान तज्ज्ञांनी देखील येत्या दोन-तीन दिवसात महाराष्ट्रभर पाऊस पडेल आणि तो व्यापक होत जाईल असा दिलासा शेतकऱ्यांना आणि इतर घटकांना दिला आहे. हवामान खाते फारसे काही बोलत नाही. कारण त्यांनी व्यक्त केलेले सगळेच अंदाज आतापर्यंत फसलेले आहेत. ते देखील बदलत्या हवामानाचे पृथक्करण करून अंदाज व्यक्त करीत असतात. त्यांच्या हातात तेवढेच आहे. शेवटी त्यांनाही वेळ मारून न्यायची असते. त्याप्रमाणे हा विभाग बोलत असतो. शेवटी चातक पक्षी ज्याप्रमाणे पावसाची वाट बघतो आणि पावसाळ्यात झाडांवरील पानावर असलेले पाण्याचे थेंब पिऊन आपली तहान भागवतो त्याची आठवण सर्वांनाच या काळात येते. कोकीळ समाजातील हा पक्षी त्याच्याच आकाराचा असतो आणि तो हजारो किलोमीटरचा प्रवास दक्षिण आफ्रिकेतून सुरू करून भारतात येतो. कोकिळेप्रमाणेच स्वत: चे घरटे तो बांधत नाही. भारतीय संस्कृतीत असा एक समज आहे की चातक फक्त स्वाती नक्षत्रातील पडणारा पाऊस पितो आणि नंतर वर्षभर पाणी पीत नाही. त्या काळात तो आफ्रिकेत गेलेला असतो. संत साहित्यात आणि इतरत्र मराठी साहित्यात चातकाची महती अनेकांनी सांगितलेली आहे. ज्याप्रमाणे चातक पक्षी पाण्याची वाट बघतो त्याप्रमाणे भक्त विठ्ठलाच्या भेटीची वाट बघतो अशी वर्णने अभंगात सापडतात. एकंदर भारतीय नसला तरी चातकाचा सर्वांना लळा आहे. शेतकरी त्याच्याप्रमाणेच पावसाची वाट बघत आहे. लोकसंगीतात पावसाची आणि पाऊस नसण्याची अनेक वर्णने सापडतात. पड रं पाण्या, पड रे पाण्या, कर पाणी पाणी, शेत माझं लई तान्हेलं चातकावाणी. निढळा वरती हात ठेऊनी वाट किती पाहू, खिडीतोंडी हटवाद्या तू नको उभा राहू !! माणसाची कणव किंवा प्रतीक्षेतून अशा प्रकारच्या काव्यपंक्ती कवींच्या वर्णनात आढळतात. चिंब पावसानं रानं झालं आबादानी, झाकू कशी पाठीवरली, चांदणं गोंदणी असे खानदेश कवी ना .धो. महानोर आपल्या कवितेतून म्हणतात. पण पाऊस असेल तरच त्याचे महत्त्व जाणवते. पर्जन्याची चाहूल, मेघांची वरात, मोतियाचे थेंब, माझिया घरात अशा पावसानंतरच्या कविता भरपूर आहेत. ग्रेस असे म्हणतात, पाऊस कधीचा पडतो, झाडांची हलती पाने, हलकेच जाग मज आली, दुःखाच्या मंदसुराने, डोळ्यात उतरले पाणी अशा पद्धतीने खूप पाऊस असूनही कवीला ज्या वेदना होतात आणि डोळ्यात पाणी उतरते त्याचे प्रत्यंतर या कवितेतून येते. पण पाऊसच नसेल तर त्या कुठल्याच शब्दांना काही अर्थ उरत नाही. सध्याची वेळ तशीच आहे.. रूक्ष कोरडाच गेला, आषाढाला नाही ओल,ऊन पाऊस खेळेना श्रावणाचा गेला तोल. अशा कविता करण्याची वेळ कवींवर येऊन ठेपली आहे. जसे काव्याचे तसे अर्थव्यवस्थेचे. आजही आपला देश कृषी आधारित असल्यामुळे पाऊस पाणी, पिकांच्या भरवशावरच अर्थव्यवस्था सुदृढ असते. जर दुष्काळ पडला तर अर्थव्यवस्था देखील कोलमडून पडते. पिण्याचे पाणी आणि गुरांचा चारा या संदर्भात गंभीर प्रश्न उभे राहतात. आत्ताच धरणे आणि तलाव तळाशी गेलेले आहेत. ते भरतील. पिण्याचे पाणी उपलब्ध होईल. भलेही शेतीचे गणित चुकले तरी तडजोड करून घेऊ पण पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे. अन्नधान्य कुठूनही आयात करता येईल आणि वेळ मारून नेता येईल. हवामान तज्ञांनी व्यक्त केलेल्या अंदाजानुसार येत्या दोन-तीन दिवसात पावसाचे आगमन झाल्यास सगळीकडे चिंब पावसाने आबादानी होईल अशी अपेक्षा करूया.

# फिस्टुला इन एनो (भगंदर): दुर्लक्ष केल्यास वाढू शकणारा आजार, वेळेत उपचार घेणे अत्यावश्यक

गुदमार्गाच्या आजारांमध्ये फिस्टुला इन एनो किंवा भगंदर हा एक सामान्य पण रुग्णाच्या दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम करणारा आजार आहे. अनेक रुग्ण लाज, भीती किंवा अपुऱ्या माहितीमुळे उपचार घेण्यास विलंब करतात, परिणामी आजार अधिक गुंतागुंतीचा होऊ शकतो. त्यामुळे फिस्टुलाबाबत जनजागृती होणे आवश्यक आहे.




## धुळ्यात प्रथमच!

आमच्या प्रोक्टोलॉजी विभागात नवीन अत्याधुनिक उपकरणाची भर पडल्याची आनंदाने घोषणा करत आहोत - ॲनल स्फिंक्टोमीटर.

हे उपकरण गुदद्वाराच्या सकायूंचा टोन (दाब/प्रेशर) अचूकपणे मोजते.

याचा विशेषतः खालील आजारांच्या अचूक निदान व उपचार नियोजनासाठी मोठा उपयोग होतो:

गुदद्वाराची भेग, मलावरोध नियंत्रण न राहणे, प्रसूतीनंतर होणारे गंभीर पेरिनियल फाटणे, इतर गुदद्वार व पेल्विक फ्लोअर संबंधी विकार

या आधुनिक तंत्रज्ञानामुळे रुग्णांना अधिक अचूक, वैज्ञानिक व परिणामकारक उपचार देणे शक्य होणार आहे. धुळेकरांसाठी प्रगत प्रोक्टोलॉजी सेवा उपलब्ध करून देण्याच्या आमच्या प्रयत्नातील आणखी एक महत्त्वाचे पाऊल!



गुरुद्वाराच्या स्नायुवर किती दाब पडतो याचे अचुकपणे मोजणारे यंत्र ज्या आधारे अंदाजाने नव्हे तर शास्त्रशुद्ध पद्धतीने इलाज करणे शक्य होते. यामुळे रूग्णांच्या अनेक समस्या लवकर दुर होण्यास मदत होते.

### फिस्टुला म्हणजे काय?

गुदमार्गाच्या आत असलेल्या लहान ग्रंथींमध्ये संसर्ग झाल्यास गुदमार्गाभोवती फोड तयार होतो. हा फोड फुटल्यानंतर गुदमार्गाच्या आतील भाग आणि बाहेरील त्वचा यांच्यामध्ये एक असामान्य नलिका तयार होते. या नलिकेला फिस्टुला इन एनो किंवा भगंदर म्हणतात.

### फिस्टुला होण्याची कारणे

गुदमार्गाभोवती झालेला संसर्ग किंवा फोड, क्रोहन रोग सारखे आतड्यांचे दाहजन्य आजार, क्षयरोग, मधुमेहामुळे होणारे वारंवार संसर्ग, पूर्वी झालेल्या शस्त्रक्रिया किंवा दुखापती, रोगप्रतिकारक शक्ती कमी असणे

### प्रमुख लक्षणे

फिस्टुलाची लक्षणे सुरुवातीला सौम्य असू शकतात, परंतु कालांतराने ती वाढू शकतात.

गुदद्वाराजवळून सतत किंवा अधूनमधून पू, रक्त किंवा स्राव येणे, गुदमार्गाभोवती वेदना व सूज, बसताना किंवा चालताना त्रास होणे, खाज, जळजळ किंवा अस्वस्थता, वारंवार फोड होणे, दुर्गंधीयुक्त स्राव, ताप किंवा अशक्तपणा (संसर्ग वाढल्यास)

### उपचारात विलंब केल्यास काय होऊ शकते?

अनेक रुग्ण वेदना कमी झाल्यानंतर उपचार टाळतात. मात्र फिस्टुला स्वतःहून पूर्णपणे बरा होत नाही. उपचार न घेतल्यास:

संसर्ग वारंवार होऊ शकतो, अनेक नवीन नलिका तयार होऊ शकतात, फिस्टुला अधिक खोल आणि गुंतागुंतीचा बनू शकतो, शस्त्रक्रिया अधिक कठीण होऊ शकते, जीवनमानावर गंभीर परिणाम होऊ शकतो



डॉ. रवी वानखेडकर
प्रॉक्टोलॉजिस्ट (मुळव्याध तज्ञ)
मो.९४२२२ ९६४९५

### निदान कसे केले जाते?

तज्ज्ञ सर्जन रुग्णाची तपासणी करून निदान करतात. काही प्रकरणांमध्ये फिस्टुलाचा मार्ग व खोली समजण्यासाठी एमआरआय किंवा इतर तपासण्या कराव्या लागू शकतात.

### आधुनिक उपचार पद्धती

फिस्टुला हा केवळ औषधांनी पूर्णपणे बरा होत नाही. त्यासाठी शस्त्रक्रिया आवश्यक असते. आज उपलब्ध असलेल्या आधुनिक उपचार पद्धतींमध्ये:

फिस्टुलो टॉमी (Fistulotomy), सेटॉन तंत्र (Seton Placement), लेझर फिस्टुला उपचार (Laser Surgery), LIFT Procedure, VAAFT (Video Assisted Anal Fistula Treatment) यांचा समावेश होतो. योग्य उपचार पद्धतीची निवड फिस्टुलाचा प्रकार, त्याची खोली आणि रुग्णाच्या प्रकृतीनुसार केली जाते.

### प्रतिबंधासाठी काय करावे?

गुदमार्गाची स्वच्छता राखावी, बद्धकोष्ठता टाळावी, भरपूर पाणी प्यावे, फायबरयुक्त आहार घ्यावा, मधुमेह नियंत्रणात ठेवावा, गुदमार्गाभोवती फोड किंवा संसर्ग झाल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा

### जनतेसाठी संदेश

गुदमार्गातून पू येणे, वारंवार फोड होणे किंवा गुदद्वाराजवळ सतत त्रास जाणवत असल्यास लाज न बाळगता तज्ज्ञ सर्जनांचा सल्ला घ्यावा. फिस्टुला हा उपचाराने पूर्णपणे नियंत्रणात येऊ शकणारा आजार आहे. वेळेत निदान आणि योग्य उपचार घेतल्यास रुग्ण सामान्य जीवन जगू शकतो.

# आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात योगातून निरोगी जीवनाचा संदेश

नंदुरबार,दि. २१ (प्रतिनिधी) - आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त नंदुरबार येथे जिल्हास्तरीय योग कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. करा योग, रहा निरोग हा संदेश देत नागरिकांमध्ये योगाविषयी जनजागृती करण्यासाठी पंचायत समिती नंदुरबारच्या गट साधन केंद्रामार्फत जी. टी. पाटील महाविद्यालय येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विविध शाळांतील विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी महेश पाटील, उपशिक्षणाधिकारी भावेश सोनवणे, गटशिक्षणाधिकारी जयंत चौरे, क्रीडा संचालक प्रा. ईश्वर धामणे, जिल्हा युवा अधिकारी भूषण पाटील, क्रीडा अधिकारी ओमकार जाधव, संजय बेलोस्कर, क्रीडा मार्गदर्शक भगवान पवार, नगरसेवक आनंदा माळी, नगरसेवक कुणाल वसावे, नगरसेविका योगिता वसावे, लायनेस क्लबच्या हिना रघुवंशी, मंगेश निकुंभ, प्राचार्य महेंद्र रघुवंशी, किसन महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.



# सिद्धेश्वर गुड मॉर्निंग ग्रुप म्युझिकल योगदिन

धुळे, दि. २१ (प्रतिनिधी)- जागतिक योग दिनानिमित्त धुळे शहरातील पांजरा नदीकाठी असलेल्या सिद्धेश्वर गणपती मंदिर परिसरात सिद्धेश्वर गुड मॉर्निंग ग्रुपतर्फे म्युझिकल योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सिद्धेश्वर गणपती मंदिर परिसरात दररोज राजेंद्र कदम व योगेश फरताडे यांच्या मार्गदर्शनाखाली म्युझिकल योगाचे नियमित आयोजन केले जाते. शरीर तंदुरुस्त राहावे तसेच विविध आजारांपासून दूर राहण्यासाठी योगाचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

जागतिक योग दिनानिमित्त आयोजित विशेष सत्रात योग प्रशिक्षक राजेंद्र कदम आणि योगेश फरताडे यांनी उपस्थितांना विविध योगासने, प्राणायाम आणि योगाचे आरोग्यदायी फायदे याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित राहून योगाभ्यासात सहभागी झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रवीण चौधरी, मधुकर लोकरे, राज चव्हाण, राजू पालेकर, राहुल वाघ, राजेश पाखरे आदींनी विशेष परिश्रम घेतले. योगामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## शब्दकोडे क्रमांक : २३९४

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | | ५ | ■ | ६ | ७ | |
| ८ | | ■ | ९ | १० | | ■ | ११ | १२ | | | ■ |
| | ■ | १३ | | | ■ | १४ | ■ | | ■ | १५ | १६ |
| ■ | १७ | | | ■ | १८ | | १९ | ■ | २० | ■ | |
| २१ | | ■ | २२ | २३ | | ■ | २४ | २५ | ■ | २६ | |
| ■ | २७ | २८ | ■ | २९ | | ३० | ■ | ३१ | ३२ | | ■ |
| ३३ | ■ | ३४ | ३५ | | ■ | ३६ | ३७ | ■ | | ■ | ३८ |
| ३९ | ४० | ■ | | ■ | ४१ | | | | ■ | ४२ | |
| ४३ | | ४४ | ■ | ४५ | | ■ | | ■ | ४६ | | |
| | ■ | ४७ | ४८ | | ■ | ४९ | | ५० | ■ | ५१ | |
| ■ | ५२ | ■ | ५३ | | ५४ | | ■ | ५५ | ५६ | | ■ |
| ५७ | | | | ■ | | ■ | ५८ | | | ■ | ५९ |

**आडवे शब्द :** १.मन हेलावून टाकणारे ४.अपुरा ६.गुरांना बांधावयाची दोरी ८.एक देखणा पक्षी ९.विजया दशमी ११.तळहात १३.सज्जड दम १५.नरकाधिपती १७.एका जागी स्थिर नसलेला १८.गुणांची केलेली पारख २०.कश्यासाठी २१.गावची वेस २२.धूर्त २४-तीन दशक मिळून तयार होणारी संख्या २६.काहीही न बोलता शांत राहण्याची क्रिया २७.होकार २९.रोकड ३१.हिंदीत-मुलगा ३४.फणसाची एक जात ३६.इंग्रजीत-पैसे ३९.एकी विदेशी मद्य ४१.काळजीने व्यस्त असलेला ४२.मनातील बोच ४३.बोलका-उलट लिहा ४५.विचार-हिंदीत ४६.गुणांची केलेली कदर ४७.तोरा ४९.सुसर ५१.पिता ५३. रात्री उमलणारे एक फुल ५५.आपल्या अवती-भवतीचा परिसर ५७.एखाद्या गोष्टीचा केलेला उदोउदो ५८.बाब ५९.संगीतातील सातवा स्वर **उभे शब्द :** १.पक्षी २.सेवक ३.परेड ४.मिजाज ५.पत्र ६.दंत ७.वर्तुळ १०.जस-उलट लिहा १२.मग्न १३.शाळेत गुरुजींना आपण मारतो ती हाक १४.नाद १६.थोर १७.इंग्रजीत-ताप १८.कठोर २३.लहान मनातील वेदना २६.संधी २८.उत्तर ३०.माया ३२.भीती ३३.शासन ३५.फुलातील पराग कण ३७.जुन्या काळातील एक हिंदी सिने अभिनेत्री ३८.पूर्वी युद्धात वापरायचे तो लोखंडी अंगरखा ४०.मैल ४१.एक आंबट फळ ४२.मुकुट ४४.लाकडाची लेखणी ४५.साथीने असलेला ४८.अकराव्या नंतर येणारा ४९.लहान आकाराचे गोलाकार रत्न ५०.रिवाज ५२.तुज ५४.गुपित ५६.हार

### शब्दकोडे क्रमांक : २३९३ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | व | ल | ■ | तो | ■ | च | ल | न | ■ | चा | क |
| ■ | त | क | रा | र | दा | र | ■ | दी | न | क | र |
| मा | न | ■ | ख | ण | ■ | बी | ल | ■ | ज | र | ■ |
| ल | ■ | प | ण | ■ | प्र | ■ | व | जी | र | ■ | घो |
| ■ | प | ■ | दा | स | बो | ध | ■ | त | ■ | चा | ■ |
| ऐ | त | वा | र | ■ | ध | र | ती | ■ | ह | ल | ख |
| ■ | न | र | ■ | प | न | ■ | न | व | मी | ■ | त |
| प्र | ■ | दा | मि | नी | ■ | अ | ■ | ळ | ■ | ते | रा |
| सं | वा | द | ■ | र | घु | वी | र | ■ | दै | ना | ■ |
| ग | ज | ■ | ती | ■ | ब | ट | ■ | नो | ■ | ली | ला |
| ■ | वी | स | ■ | तो | ड | ■ | दा | ■ | फ | रा | ळ |
| नी | ■ | पा | व | टा | ■ | आ | वा | रा | ■ | मा | ■ |

# जागतिक सिकलसेल दिनानिमित्त कार्यक्रम

धुळे, दि.२० - जागतिक सिकलसेल दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय सोनगीर (ता.धुळे) येथे आजाराविषयी माहिती व जनजागृतीपर कार्यक्रम झाला.

ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विक्रम वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन केले. प्रयोगशाळा तंत्रज्ञ कैलास वाडीले, उदय पाटकर, समुपदेशक शीतल पाटील, धनश्री बच्छाव, जयश्री चौधरी, कर्मचारी उपस्थित होते. सिकलसेल हा आजार आई वडीलांकडून मुलांमध्ये संकरित होतो. त्यामुळे पालकांनी काळजी घ्यावी, असे डॉक्टरांनी केले.













# आदि. जनता विद्यालयात योग दिन उत्साहात साजरा

शिरपूर,दि.२१ (प्रतिनिधी)- येथील आदि जनता विद्या प्रसारक संस्थेचे शिवराम भिमजी अंतुर्लीकर माध्यमिक विद्यालय शिरपूर व सुपामाय शिवराम अंतुर्लीकर प्राथमिक विद्या मंदिर शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेच्या आदर्श नगर येथील मध्यवर्ती कार्यालयाच्या पटांगणात प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी एकत्र उपस्थित होते. आर. एस. नगराळे यांनी योग दिवसाचे महत्व सांगितले.

पी.सी. वळवी यांनी विविध प्रकारची योगासने करून दाखविली. व त्याचे महत्त्वही सांगितले. उपस्थित सर्व विद्यार्थी व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी ताडासन, पद्मासन, भुजंगासन, वज्रासन, सूर्यनमस्कार इ. केले यांसह अनुलोम विलोम, कपालभाती, भ्रामरी इत्यादी प्राणायाम केले.

## प्रकाश में आज




नाना पाटेकर, मधु, मोहन जोशी, अतुल अग्निहोत्री, अरुण बक्षी

येरे येरे पावसा.. पून्हा कर्ज काढून देईन तुला पैसा..



## जन शिक्षण संस्थेत योग दिन साजरा

धुळे, दि.२१- कौशल्य विकास उद्योजकता मंत्रालय भारत सरकार पुरस्कृत जन शिक्षण संस्थान, धुळे येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्या त आला. या कार्यक्रमास संस्थेच्या संचालिका सौ. तय्यबा शेख मॅडम, सर्व रिसोर्स पर्सन तसेच कर्मचारी वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात योगाभ्यासाने करण्यात आली. सर्व रिसोर्स पर्सन व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध योगासने व प्राणायाम केले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते, असा संदेश सौ.दिपाली सोनवणे यांनी दिला. व योगाचे महत्त्व पटवून दिले. संस्थेच्या संचालिका तय्याबा शेख मॅडम देखील योगाभ्यासात सहभागी होऊन उपस्थितांना योगाचे महत्त्व पटवून दिले.

# महावितरण वीज कंपनीला शेअर मार्केटमधे लिस्टींग करण्यास वर्कर्स फेडरेशनचा विरोध - कॉम्रेड मोहन शर्मा

**दोंडाईचा, दि.२१ - महाराष्ट्र शासनाच्या अधिकार क्षेत्रातील महावितरण वीज कंपनी ही राज्यातील ३ कोटी १७ लाख वीज ग्राहकांना आणि ३ लाख शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात अखंड वीज पुरवणारी देशांतील अग्रगणी वीज कंपनी आहे. या कंपनीने ३ लाख किलोमिटरची वीज यंत्रणा उभारून ९९ टक्के प्रदेशाला वीज पुरवठा करण्याचे लक्ष्य गांठले आहे. या वीज कंपनीतील कर्मचारी, अभियंते, अधिकारी यांनी जिवाचे रान करून ३ लाख कोटी रूपयाची मालमत्ता उभी केलेली आहे. अश्या आशिया खंडात नावाजलेल्या या कंपनीचे खासगीकरण होऊ नये म्हणून झालेल्या राज्यव्यापी संपावेळी मा. देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री व उर्जामंत्री यांनी वीज कंपन्याचे कोणत्याही प्रकारचे खासगीकरण होणार नाही हे मान्य केले आहे. कॉ. नाना पाटील केंद्रीय सल्लागार यांनी अशी माहिती पत्रकाद्वारे दिली आहे.**

### खासगीकरण शब्द प्रयोग टाळून खासगीकरणाचे नवीन मार्ग

दि. ७ एप्रील २०२६ रोजी महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे दोन विभागात विभाजन करण्यास मान्यता दिली.पहिली कंपनी औद्योगिक, व्यवसायिक, निवासी आणि इतर वीज ग्राहक यांचेकरीता आणि दुसरी एम.एस.ई.बी. सोलर अॅग्रो पॉवर लिमीटेड ही स्वतंत्र कंपनी पुर्णतः शेती ग्राहकांसाठी.या निर्णयामुळे स्वतंत्र कृषी कंपनीतील ४४ लाख शेतकरी कृषी पंपधारकांकडे असलेल्या थकबाकीची जबाबदारी सरकार घेणार आहे. परिणामी वितरण कंपनीवर असलेला थकबाकीचा भार कमी होऊन आर्थीक स्थिती बळकट होण्यास मदत होईल.

कृषी कंपनी निर्माण करण्यास शासनाचा हेतू योग्य आहे असे गृहीत धरले तरी त्यानंतर महावितरण कंपनीला शेअर मार्केटमधे लिस्टिंग करण्यामागे शासन व व्यवस्थापणाचा हेतू छुप्या मार्गाने खासगीकरणाकडे घेऊन जाण्याचा आहे.आय. पी.ओ हे दुसरे तिसरे कांही नसून सार्वजानिक क्षेत्रातील सरकारी महावितरण कंपनीतील मालकी कमी करण्याचे व त्यामाध्यमाने खासगीकरणाच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. म्हणून वर्कर्स फेडरेशनचा आय.पी.ओ.ला तिव्र विरोध आहे.

### आय.पी.ओ.चे संभाव्य धोके

आय.पी.ओ.नंतर महावितरण कंपनीचे शेअर्स बाजारात सुचीबध्द होऊन खरेदी विक्रीसाठी उपलब्ध होतील. सुरवातीला शासनाने व व्यवस्थापणाने खासगी क्षेत्रातील सुचीबध्द होणाऱ्या शेअर्सची संख्या टक्केवारीत कमी दाखवली असली तरी हे प्रमाण हळूहळू भांडवलदार कंपन्या महावितरणमधील आपली मालकी वाढवतील. महाविरतण कंपणीचा आय.पी.ओ.म्हणजे सरकारी मालकी कमी करण्याचे एक साधन असून खासगकीरणाकडे घेऊन जाण्याचा मार्ग आहे. आय पी ओ नंतर महावितरणमधील सरकारी हिस्सा कमी करण्यास 'फॉलो ऑन पब्लिक' ऑफरिंग्ज आणल्या जांतील. अशाच प्रकारे गेल्या कांही वर्षात ऋझजड च्या माध्यमातून अनेक सार्वजानिक उपक्रमांतील सरकारी मालकी ५५ ते ६० टक्यापर्यत खाली आणली गेली आहे ही वास्तविकता नजर अंदाज करता येणार नाही. आय पी ओ मुळे महावितरणमधील सामाजिक अकांऊटॅबिटी संपून प्राफिटीबिलीटी (नफेखोर) अकाऊंटींगची ही सुरवात ठरणार आहे.

### महावितरणमधील कर्मचाऱ्यांना आमिष दाखवले जाईल

महावितरणचे कर्मचारी,अभियंते व अधिकाऱ्यांनी आय.पी.ओ.ला विरोध करू नये म्हणून शासन व व्यवस्थापणाव्दारे १०-१५ टक्के शेअर्स देण्याचे प्रलोभनही देण्यात येण्याची शकयता आहे. मात्र आय.पी.ओ.च्या धोरणाने स्टेट बँक ऑफ इंडिया, एन. डी. टी.व्ही, जिनस कंपनी आणि एल आय सी वर झालेले परिणाम समोर आहेत. आय पी ओ व्दारा शेअर्सचे लिंकेज सरकार करीता ५१ टक्के च्या वर राहील त्यामुळे त्यानंतरही कंपनीवरील नियंत्रण सरकारकडेच राहील हा प्रथमदर्शनी सरकार व व्यवस्थापणाचा युक्तीवाद राहील. मात्र आपल्याला हे विसरता येणार नाही की केन्द्रिय वित्त मंत्रालयाच्या मुख्य आर्थीक सल्लागारांनी सार्वजानिक क्षेत्रातील उपक्रमामधील किमान सरकारी हिस्सेदारीची मर्यादा २६ टक्के पर्यंत खालील आणण्याचे निर्देश दिले आहेत. राज्य सरकार आणि आपले व्यवस्थापण यांनी ते पाळले तर भांडवलदार कंपन्यांचे नियंत्रण आपोआप येणार आहे.

फक्त आय पी ओ नव्हे तर विविध मार्गाने महावितरण कंपनीचे अफाट क्षेत्र भांडवलदार व त्याच्या कंपन्यांच्या अधिकार क्षेत्रात झोकून खासगीकरण करण्याची प्रक्रिया आहे. वीज उद्योगाच्या खासगीकरणासाठी विवीध मार्गाचा अवलंब केला जात आहे, फॅन्चाईसीकरण, समांतर वीज वितरणाचा परवाना,महावितरण कंपनीशी स्पर्धा करण्यासाठी खासगी कंपन्या आणणे, स्मार्ट बिलींगच्या माध्यमाने मिटर रिडींग,वसुलीचे काम संपृष्ठात आणणे सध्या महाराष्ट्रात सुरू आहे. महावितरणच्या कांही सर्कल मध्ये फॅन्चाईसी कंपन्या आणण्याचे प्रयतक जोरदार सुरू आहेत. म्हणून या धोरणांचा व उपायाचा विरोध करण्यास कामगार, कर्मचारी, अभियंते व अधिकाऱ्यांना एकजुटीने आपली कंपनी वाचवण्याकरीता व आपल्या अस्तित्वाकरीता संघटित झाले पाहिजे.

सार्वजानिक क्षेत्रातील उपक्रम असलेल्या आय डी बी आय बँकेच्या बाबतील सरकारने सुरवातीला खझ्झज आणि ऋझ्झज च्या माध्यमातून सरकारी मालकी सातत्याने कमी केली व नंतर या बॅकेत एलआयसीला मोठा भागधारक बनवून सरकारने आपली हिस्सेदारी टक्के पेक्षा खालील आणली परिणामी आयडीबीआय बँक ही सार्वजानिक क्षेत्रातील बँक राहिलेली नाही आणि तिचे खासगीकरण केले जाऊ शकते. महावितरणची अवस्था देखील अगदी अशीच होऊ शकते.

### कोटयावधी रूपयाची मालमत्ता असलेल्या महावितरणची किंमत १४००० कोटी कशी?

४७८ कोटी रूपयाच्या नफ्यात असलेलया महावितरण कंपनीश्ची आय पी ओ करीता एकूण किंमत केवळ १४००० कोटी रू. लावण्यात आली आहे. भांडवलदाराच्या फायद्याकरीता ही कमी किंमत लावण्यात आली जेणेकरून अदाणी सारख्या कंपन्यांचे ते हिताचे होईल. याला वर्कर्स फेडरेशनचा विरोध आहे.

वीज क्षेत्राचा खासगीकरणाव्दारे संपुर्ण ताबा मिळवण्याचा हा अदाणी, अंबानी, टाटा, गोयंका, जिंदाल टोरंट (मेहता ग्रुप) यासारख्या देशातील सर्वात मोठ्या भांडवलदारांचा अजेंडा आहे. या मक्तेदार घराण्यांचे देशातील औष्णिक वीज निर्मितीवर आधीच वर्चस्व आहे आणि अक्षय उर्जा मिर्मितीवर तर त्यांची पुर्ण मोलाची मालकी आहे. आता त्यांना महावितरण,महापारेषण या क्षेत्रावरही नियंत्रण मिळवायचे आहे. आय पी ओचे हे धोरण त्या अजेंड्याच्या दिशेने उचळलेले एक आक्रमक पाऊल आहे.

### शासनाने स्टेकहोल्डर कामगार संघटनांना विश्वासात घेतले नाही

त्यामुळे शेअर मार्केटमधे लिस्टींग करण्याबाबत कामगार संघटनाच्या मनांत अनेक प्रश्न आहे. प्रस्तावित प्रारंभिक सहभाग विक्रीसाठी (खझ्झज) बुक रनिंग लीड मॅनेजर्स (मर्चन्ट बॅंकर्स) यांच्या निवडीसाठी प्रस्ताव व मागणी निविदा दि. २७ मे २०२६ रोजी काढली असून या निविदा बाबत कुठल्याही वर्तमानपत्रात जाहिरात देण्यांत आलेली नाही. त्यामुळे ही निविदा संशयाच्या भोवऱ्यात आहे.

मा. मुख्यमंत्री व उर्जामंत्री यांनी कामगार संघटना समवेत संयुक्त बैठक आयोजित करून या अत्यंत संवेदनशील धोरणावर चर्चा घडवून आणण्याची विनंती महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेने केली आहे. अशी माहिती कॉ.नाना पाटील केंद्रीय सल्लागार दोंडाईचा यांनी दिली आहे.

## पटेल आश्रमशाळेत प्रवेशोत्सव उत्साहात


शिरपूर, दि.२०- तालुक्यातील वाघाडी येथील आर.सी.पटेल अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत इयत्ता पहिली मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी प्राचार्य जे.व्ही. गिरासे, मुख्याध्यापक पी.एन. लोहार, वाघाडी गावाचे सरपंच किशोर माळी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय धुळे संपर्क अधिकारी पल्लवी जाधव, माजी विद्यार्थी वैद्यकीय अधिकारी डॉ. रणजीत पावरा, डॉ.मेघा ठाकरे, डॉ. सजीवन पावरा आदी मान्यवर, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, इयत्ता पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. माजी विद्यार्थी वैद्यकीय अधिकारी डॉ. रणजित पावरा यांनी आदिवासी भाषेत विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले व शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. प्राचार्य व मुख्याध्यापक यांनी देखील मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका डॉ.भावना पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन शिक्षक जी.बी.थोरात यांनी केले. या कार्यक्रमासाठी शाळेच्या सांस्कृतिक समितीने मोलाचे योगदान दिले. माता पालक संघ, शिक्षक पालक संघ यांची देखील पालक व मान्यवरांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

# धुळ्यातील एस.व्ही.के.एम. सीबीएसईच्या विद्यार्थ्यांचे सीईटी परीक्षेत उल्लेखनीय यश

**धुळे, दि.२१- श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई संचलित धुळे येथील एस.व्ही. के.एम. सीबीएसई स्कूलच्या बारावीच्या विद्यार्थ्यांनी सीईटी चक्क-उएढ २०२६ परीक्षेत उल्लेखनीय आणि अभिमानास्पद यश संपादन करत शाळेच्या उत्कृष्ट शैक्षणिक परंपरेला नवी उंची प्राप्त करून दिली आहे. विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रम, शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन आणि व्यवस्थापनाच्या भक्कम पाठबळामुळे ही यशस्वी कामगिरी शक्य झाली आहे.**





पीसीबी (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) गटामध्ये दक्ष मेहता याने ९९.९४ पर्सेंटाइल मिळवत तसेच भौतिकशास्त्र या विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत शाळेचे नाव उज्वल केले. रहमानी अली मोबीन याने ९९.४५ पर्सेंटाइल, मिस्बाह गनोडवाला ९७.१६ पर्सेंटाइल, फयेझाह पठाण ९६.६८ पर्सेंटाइल, छनक बावस्कर ९३.९२ पर्सेंटाइल, अंश कुंभारे यांनी ९१.८२ पर्सेंटाइल मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

पीसीएम (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित) गटामध्ये साची अग्रवाल हिने ९९.५६ पर्सेंटाइल मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली. राजवीर भतवाल ९८.११ पर्सेंटाइल, मनन नहार ९७.४५ पर्सेंटाइल, शामोईल पठाण ९७.३२ पर्सेंटाइल, ऋतू भावसार ९६.४३ पर्सेंटाइल, कवी शेख ९५.१० पर्सेंटाइल, हेशाम अन्सारी ९४.९१ पर्सेंटाइल, रुही रेडासानी ९४.४७ पर्सेंटाइल, रेहान ९३.४ पर्सेंटाईल मिळवत यशाची परंपरा कायम राखली.

धुळे कॅम्पसचे चेअरमन संजय अग्रवाल, मुख्याध्यापिका सौ. सुनंदा मेनन व उपमुख्याध्यापिका पिंक साहा यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

विशेष बाब म्हणजे सीईटी चक्क-उएढ २०२६ परीक्षेत सहभागी झालेल्या २२ विद्यार्थ्यांपैकी तब्बल १४ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक पर्सेंटाइल मिळवत शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची प्रचिती दिली. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण शाळा परिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या यशाबद्दल एस.व्ही. के.एम. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल, स्कूल संचालिका गिरीजा मोहन, उपसंचालिका पियाली कुलकर्णी, प्राचार्या सौ. सुनंदा मेनन, उपमुख्याध्यापिका पिंक साहा, सर्व शिक्षक यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, व्यवस्थापनाचे प्रोत्साहन आणि पालकांचे सहकार्य यांचा महत्त्वपूर्ण वाटा असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या असून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी संपूर्ण शाळा परिवाराकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

---

सुनावणीची तारीख २३ जुलै सन २०२६

[Sp1.-H.C.A.S.C.D.50m.

हुकुमाची तारीख ११ माहे जून सन दोन हजार सव्वीस

**दुसरे अपील नंबर ३०३/२०२०**

जिल्हा न्यायाधीश ५,
धुळे जि. धुळे कोर्टाचा

सन १९ पैकी किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ३३ सन २०१७

**मुंबई येथील न्यायाधिकारी हायकोर्टात खंडपीठ औरंगाबाद**

देविदास पिराजी थोरात .. अॅपेलन्ट

तर्फे अॅडव्होकेट पाटील महेश एच.

विरुद्ध

अरविंद (अरुण) पी. थोरात व ईतर

प्रति,

सा. नं. ३ : कमल वसंतराव भामरे मयत तर्फे वारस

सा. नं. ३-C : नितीन वसंतराव भामरे
वय : ५२वर्षे, धंदा : मजुरी
रा. प्लॉट नं. ६७, कृषी कॉलनी, नागांवबारी,
बर्फ फॅक्ट्रीजवळ,देवपूर,धुळे ४२४००५ . ..सामनेवाले

सदरहू रिस्पॉडन्ट सा. नं. ३-C वरील प्रमाणे राहणार वरिलप्रमाणे मजकूर यास सलाम, कळावे की सदरील लिहिलेले मुकादम्यातील जिल्हा न्यायाधीश ५, धुळे जि. धुळे जज्ज यांचे हुकुमनाम्यावर सदरहू अॅपेलन्ट देविदास पिराजी थोरात याने दुसरे अपील दिले असून ते या कोर्टाचे रजिस्टरात दाखल करण्यात आले व या दुसऱ्या अपिलाची चौकशीची तारीख २३ जुलै सन २०२६ रोजी होईल. असा या कोर्टाने हुकुम केला आहे.

यास्तव तुमच्यातर्फे तुम्ही स्वत: किंवा तुमचा अॅडव्होकेट किंवा तुमच्यातर्फे मुकदमा चालविण्यास कायद्यावरुन ज्यास अधिकार आहे असा कोणी असामी सदरहू दुसरे अपील चालविण्यास हजर झाला नाही तर तुमच्या परोक्ष एकतर्फी त्या अपिलाची चौकशी होवून निकाल करण्यात येईल. यास साक्ष नामदार माननीय श्री. रविंद्र व्ही. घुगे एस्कवायर सदरहू मुंबई येथील प्रभारी मुख्य न्यायाधिकारी.

आज
तारीख ११ माहे जून सन दोन हजार सव्वीस.

कोर्टाच्या हुकुमाने

सौ.आरती एच.चोपकर — क्लार्क
अजय एस.सोनार — कक्ष अधिकारी

(शिक्का)

सौ. एस.यु. अंबेकर
फॉर डेप्युटी रजिस्ट्रार

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मौजे महिंदळे येथील स. नं. ४०/१ पैकी प्लॉट नं. १० चे एकूण क्षेत्र ३२५ चौ. मी. यास वि. सि. स. नं. १००९ चे एकूण क्षेत्र ३१८.७० चौ. मी. सत्ता प्रकार क यापैकी उत्तरेकडील भाग चे क्षेत्र १९५ चौ. मी.**

यासी चतु:सिमा

पुर्वेस : रस्ता — पश्चिमेस : प्लॉट नं. ९
दक्षिणेस : याच प्लॉट नं. १० चा उर्वरित भाग — उत्तरेस : प्लॉट नं. ७

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकत ही आमचे अशिल **श्री. कुमार गुरुमुखदास दुसेजा व श्री. प्रकाश लालचंद दुसेजा** दोघे रा. कुमारनगर, साक्री रोड, धुळे यांचे मालकीची व ताबे उपभोगातील आहे. सदर मिळकतीबाबत **जिया हंसराज पेसवाणी** रा. ट्रेजर इसलॅण्ड, पिंपरी चिंचवड (पुणे) यांनी आमचे अशिल यांचेशी कायम खरेदी करणेचा तोंडी सौदा केलेला होता व त्या अधिकारान्वये दिनांक २३/०४/२०२६ रोजी **जिया हंसराज पेसवाणी** यांनी दै. आपला महाराष्ट्र या वर्तमानपत्रात अॅड. विजय म. मोरे यांचे मार्फत टायटल व्हेरिफिकेशन साठी जाहीर नोटीस दिलेली आहे. सदर व्यवहाराची मुदत ही तोंडी सौदा करतेवेळी आपसात दोन महिने ठरलेली होती.

सदर व्यवहार हा **जिया हंसराज पेसवाणी** ह्या त्यांच्या काही वैयक्तीक अडचणींमुळे रद्द करीत आहेत. सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत जिया हंसराज पेसवाणी यांचा आजपासून कोणत्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध राहिलेला नाही. सदर मिळकत ही मुळ मालक **श्री. कुमार गुरुमुखदास दुसेजा व श्री. प्रकाश लालचंद दुसेजा** यांचेच ताब्यात असून आजपासून मुळ मालक **श्री. कुमार गुरुमुखदास दुसेजा व श्री. प्रकाश लालचंद दुसेजा** हे सदर मिळकत दुसऱ्यास विकू शकता अगर व्यवहार करु शकता त्यास जिया हंसराज पेसवाणी यांची कोणत्याही प्रकारची हरकत नाही. **जिया हंसराज पेसवाणी** यांनी जर या मिळकतीबाबत कोणाशीही लेखी अगर तोंडी सौदा,करार वगैरे केला असेल तर तो या लेखाने रद्द होईल. व आमचे अशिलांवर तसेच वरील मिळकतीवर बांधील राहणार नाही. सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे.

सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. २०/०६/२०२६

**अॅड.रोहित राजकुमार छाबिडया**
ब्लॉक नं. आर/२, रुम नं. १, कुमारनगर, साक्री रोड, धुळे
मो. ९९२२८२८८८३/७४९९९९८९५५

---

**नावात बदल**

माझे नाव **शालिनी राकेश मोरे** यात बदल झालेला असून आता **रीता राकेश मोरे** असे आहे व या नावाने मला ओळखावे.
**पत्ता-** ७३-अ, लक्ष्मीनारायण नगर स्वामीनारायण मंदिराजवळ शिरपूर जिल्हा धुळे

**NAME CHANGE**

I Have Change My Name
From
**FARID BEG AYYAS BEG MIRZA**
To
**FARID BAIG AYYAS BAIG MIRZA**
Add - Plot No.2, Galli No. 7, Near Khatik Bhavan Mohammadi Nagar, Deopur ,Dhule.-424001

**NAME CHANGE**

Old Name
**MAHEMUDABI MUSHTAQUE AHMAD**
New Name .
**ANSARI MAHEMUDABI MUSHTAQUE AHMED**
Add - Aqsa Nagar, Near Young Boys School Dhule -424001

**Change in Name Declaration**

I, **Firoz Khan Chand Khan** Pathan, S/o Chand Khan Pathan, residing at gadge baba matha javal, g.n.5, mogalai, sakri road, Dhule, 424001. I hereby declare that my name is spelled "FIROZ KHAN" in my personal documents (Aadhaar, PAN, etc.), while in my daughter **Aaliya Kausar Feeroz Khan Pathan's** documents, my name is written as **"FEEROZ KHAN". FIROZ KHAN and FEEROZ KHAN** are one and the same person.

---

## जाहीर नोटीस

नि.९

**मे. दिवाणी न्यायाधिश सो. शिरपूर यांचे न्यायालयात**

दिवाणी कि. अर्ज नं. ३७१/२०२६

**लिलाबाई दरबार पवार व. ४** .... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .. .... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ची सासू व अर्जदार नं. २ यांची आजी व अर्जदार नं. ३, ४ यांची वडिलांची आजी नामे रताबाई उर्फ रुख्मणीबाई रुपा पवार हे दि. २८/१०/२०१६ रोजी मौजे अजनाड ता. शिरपूर जि. धुळे मयत झाल्याने अर्जदार नं. १ ते ४ यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेस कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदाराचा व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. २४/०६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.०० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही असे गृहीत धरण्यात येवून, मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

सही.. — कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर
(कोर्टाचा शिक्का)
सही... — सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय,शिरपूर.

---

## जाहीर नोटीस

नि.७

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५२७/२०२६

**१) गुलाबीबाई पांड्या पावरा, रा. चाकडू पो. कोडीद ता. शिरपूर जि. धुळे**
**२) चेतनाबाई जावऱ्या पावरा, रा. कोडीद ता. शिरपूर जि. धुळे**
**३) रेनुबाई बशिर पावरा,**
रा.घर नं.८६,वार्ड नं. २०,निहालाम्बा जि. बडवानी (मध्यप्रदेश).... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .. .... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार गुलाबीबाई पांड्या पावरा वगैरे यांनी मे. न्यायालयात नामे पांड्या भुट्या उर्फ तुकडा पावरा हे दि. ०७/०५/२००७ रोजी मौजे चाकडू ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे पांड्या भुट्या उर्फ तुकडा पावरा यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. ३०/०७/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरुन

सही.. — कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर
(कोर्टाचा शिक्का)
सही... — सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय,शिरपूर.

---

## जाहीर नोटीस

नि.

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्यु. डि. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५००/२०२६

**१) सुनिता भरतसिंग गिरासे, २) राहुल भरतसिंग गिरासे**
**३) भाग्यश्री भरतसिंग गिरासे,४) संग्राम भरतसिंग गिरासे**
वरील सर्व रा. आमोदे ता. शिरपूर जि. धुळे .... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै. भरतसिंग झगेसिंग गिरासे हे दि. ०३/०३/२०२५ रोजी मौजे आमोदे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. २१/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि. २०/०६/२०२६

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे
(कोर्टाचा शिक्का)
सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

---

## जाहीर नोटीस

अॅड. ए. टी. गिरासे
शिरपूर

**शिरपूर येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी तथा मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयात**

जन्म नोंद अर्ज नं. /२०२६

**रोहित हारसिंग पावरा**
रा. तिखीबर्डी पो. बोराडी ता. शिरपूर जि. धुळे ... अर्जदार

विरुद्ध

**म. निबंधक सो. जन्म, मृत्यू, उपपतमृत्यू व विवाह नोंद कार्यालय,**
**ग्रामपंचायत न्यू बोराडी ता. शिरपूर जि. धुळे** ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदाराचा जन्म दि. ०८/०६/२००५ रोजी मौजे तिखीबर्डी पो. बोराडी ता. शिरपूर जि. धुळे येथे झाल्यामुळे जन्म नोंद होवून जन्म दाखला मिळणेबाबत अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास १० दिवसांच्या आत स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दि. २०/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रसिद्धीस दिले असे.

सही... — कनिष्ठ लिपीक, तहसिल कार्यालय, शिरपूर, जि. धुळे
(कोर्टाचा शिक्का)
सही... — वरिष्ठ लिपीक, तहसिल कार्यालय, शिरपूर जि. धुळे

---

## जाहीर नोटीस

अॅड. ए. टी. गिरासे
शिरपूर

**शिरपूर येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी तथा मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयात**

जन्म नोंद अर्ज नं. /२०२६

**लसीबाई हारसिंग पावरा (लग्नानंतरचे नांव)**
**लसीबाई गणश्या पावरा (लग्नापूर्वीचे नांव)**
रा. तिखीबर्डी पो. बोराडी ता. शिरपूर जि. धुळे ... अर्जदार

विरुद्ध

**म. निबंधक सो. जन्म, मृत्यू, उपपतमृत्यू व विवाह नोंद कार्यालय,**
**ग्रामपंचायत न्यू बोराडी ता. शिरपूर जि. धुळे** ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार (लसीबाई गणश्या पावरा) हिचा जन्म दि. ०४/०२/१९८१ रोजी मौजे न्यु बोराडी ता. शिरपूर जि. धुळे येथे झाल्यामुळे जन्म नोंद होवून जन्म दाखला मिळणेबाबत अर्जदार हिने अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास १० दिवसांच्या आत स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दि. २०/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रसिद्धीस दिले असे.

कनिष्ठ लिपीक, तहसिल कार्यालय, शिरपूर, जि. धुळे
(कोर्टाचा शिक्का)
सहा. अधिक्षक, तहसिल कार्यालय, शिरपूर जि. धुळे

---

## जाहीर नोटीस

नि.७

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५२८/२०२६

**१) सुंगारी सुकलाल पावरा, २) शांतीलाल सुकलाल पावरा**
**३) रमेश सुकलाल पावरा**,नं.१ ते ३ रा. खैरखुटी पो.पळासनेर, ता.शिरपूर जि. धुळे.
**४) निरमाबाई आसाराम पावरा**, रा. दुर्बळ्या पो.वकवाड ता. शिरपूर जि. धुळे
**५) जिरिमाबाई नंदीलाल पावरा**, रा.खैरखुटी पो. पळासनेर ता. शिरपूर जि. धुळे
**६) सुबाराम उर्फ सुभाराम सुकलाल पावरा (मयत)**
६-अ) निरामाबाई सुभाराम पावरा,
६-ब) दिपक सुभाराम पावरा
६-क) दिनेश सुभाराम पावरा
नं. ६-अ ते ६-क रा खैरखुटी पो. पळासनेर ता. शिरपूर जि. धुळे
६-ड) सपना संदीप पावरा
रा. हिवरखेडा पो. खामखेडा ता. शिरपूर जि. धुळे .... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार सुंगारी सुकलाल पावरा वगैरे यांनी मे. न्यायालयात नामे सुकलाल मोहन पावरा हे दि. २३/०३/२०२४ रोजी मौजे खैरखुटी पो. पळासनेर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे सुकलाल मोहन पावरा यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. २१/०७/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरुन

सही.. — कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर
(कोर्टाचा शिक्का)
सही... — सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय,शिरपूर.